प्रेस नोट तारीख २७/०३/२०२५

## सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशनकडुन डिजिटल अॅरेस्ट मधील गुन्हयात सहभागी असणाऱ्या दोन गुन्हेगारांना अटक

सध्या सोलापूर शहरात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहेत. त्यामध्ये सोलापूर शहर सायबर पोलीस स्टेशन येथील तक्रारदार यांना दि.०८/११/२०२४ रोजी अनोळखी मोबाईल क्रमांकावरुन व्हॉटसअॅपव्दारे ऑडीओ व व्हीडीओ कॉल करुन, त्यांनी स्वत:ला आयपीएस अधिकारी व सीबीआय अधिकारी बोलतो आहे असे सांगुन, तक्रारदार यांना प्रथम त्यांचे नावाचे एक सिमकार्ड क्रमांक सांगुन, ते तुमच्या नावावर आहे व त्यावरुन व्हॉटसअॅपव्दारे अक्षेपार्ह मेसेज व्हायरल झालेले आहेत व त्याबाबत कुलाबा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला आहे तम्हाला आमचेकडुन Digital Arrest करण्यात आलेली आहे. याबाबत कोणाशी काहीएक चर्चा करावयाची नाही, कोणाला काही सांगायचे नाही अशी भिती घातली. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना अरेस्ट वॉरंट, सुप्रिम कोर्टाची नोटीस सर्व्हेलन्सचे ३ पानी इंग्रजी मध्ये नियम असलेली नोटीस व्हॉटसअॅपवर पाठवून ती वाचण्यास लावून त्याचा अर्थ त्यांनी तक्रारदार यांना सांगितला. तसेच तक्रारदार यांना तुम्हाला कोठेही बाहेर जाता येत नाही, बाहेर जायचे असल्यास आम्हाला विचारा, तुमचा कॅमेरा सतत चालू पाहिजे, तुम्ही कॅमेरे समोर पाहिजे असे सांगुन तक्रारदार यांना मोबाईलवर वॉटसअॅप व्हीडीओ कॉल सतत चालू ठेवण्यास सांगितले. व त्यावरुन वेगवेगळे लोकांनी स्वत:ला मोठे पदाचे अधिकारी आहोत असे सांगुन, बोलु लागले. त्यावेळी फसवणुकदार स्वत:चा चेहरा दाखवित नव्हते. त्यानंतर समोरील अनोळखी IPS पोलीस अधिकारी विजय खन्ना यांनी, कोण कोणत्या बँकेत खाते आहे ?, एफ डी किती आहे ?, म्युचवल फंड शेअर्स आहेत का? याची माहिती घेतली व तक्रारदार यांना तुमच्या जवळ कोणीही नसेल अशा ठिकाणी एका खोलीत बसण्यास सांगुन बनावट सीबीआय चे राहुल गुप्ता यांनी तक्रारदार 'आता कोर्टासमोर तुमच्या वतीने म्हणणे मांडतो, मग तुम्ही कोर्टाशी बोला, कोर्ट काय निर्णय घेईल त्यास तुम्ही जबाबदार असाल' असे सांगितले. थोडया वेळाने कोर्ट म्हणून एका अनोळखी व्यक्तीने, कॅनरा बँकेतील तुमच्या नावावरील खात्यामधून रक्कम ट्रान्सफर मनी लॉडरींग मध्ये झालेली आहे, त्याचे पुरावे आमचे समोर आहेत, त्यावर तुम्हाला काय म्हणायचे आहे असे बोलल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना माझा त्या प्रकरणाशी काहीएक संबंध नाही असे म्हणाले असता कोर्टाने मला, हे मान्य नाही, तुमचेकडे कोणताही पुरावा नाही, त्यामूळे तपासकामी सदरचे कोर्ट सद्या Adjourned (स्थगिती) करीत आहोत असे म्हणून ३ वेळा टेबलवर कशानेतरी मारल्याचा आवाज काढला. त्यानंतर सीबीआय चे राहुल गुप्ता यांनी तक्रारदार यांना उददेशुन, तुम्हाला कोर्टाचा डिसीजन कळवु, तुम्ही बसून रहा, असे सांगितले. त्यानंतर फसवणुकदाराने कोर्टाचे एकूण ५ पानाचे निर्णय असलेला इंग्रजीतील मजकूर असलेली ऑर्डर तक्रारदार यांचे वाटॅसॅपवर पाठवुन ती त्यांना पूर्ण वाचण्यास लावुन आरबीआय चे गाईडलाईन प्रमाणे तपास कामात सहकार्य केले पाहिजे असे समजावुन सांगुन एक सिक्रेट खाते असते, त्यावर तुम्ही तुमची रक्कम नोटरी करुन आम्हाला जमा करायचे असते ते तुम्हाला आमचे तपास पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच ४८ तासांत परत मिळतील असे सांगुन, एकुण २७,१०,०००/- रु इतकी रक्कम वेगवेगळया खात्यात पाठविण्यास भाग पाडुन त्यांची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केलेबाबत गुन्हा रजिस्टर क्रमांक ०८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१९ (२), ३(५) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी), ६६ (डी) प्रमाणे दि.०४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर सायबर एक्स्पर्ट टिमने तांत्रिक विश्लेषण व इतर पुरावे याव्दारे अहमदाबाद गुजरात येथुन आरोपीत नामे १) धवलभाई विपुलभाई शाह वय - ३९ २) हार्दिक रोहितभाई शाह वय ४३ दोघे राहणार - अहमदाबार शहर राज्य गुजरात यांना अटक केली आहे. सदर आरोपीतांकडुन पोलीस कोठडीदरम्यान त्याचे एकुण ०५ साथीदारांना निष्पन्न केले असुन,

Scanned with OKEN Scanner

त्यापैकी ०३ आरोपीत हे सध्या दुबई येथे परागंदा झाले आहेत. सदर गुन्हयात अटक आरोपीत यांचेकडुन गुन्हयात वापरलेला मोबाईल व फसवणुक रकमेपैकी ३,१०,०००/- रु रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे व गुन्हा उघडकीस आणलेला आहे. उर्वरीत आरोपीचा शोध घेत आहोत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सोलापूर शहर श्री.एम.राजकुमार साहेब ,मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) श्रीमती.दिपाली काळे मॅडम, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), राजन माने साहेब यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक,श्रीशैल गजा सोबत पोलीस उप-निरिक्षक नागेश इंगळे, पोना/१३४८ कृष्णात जाधव, पोकॉ/६६५ रतिकांत राजमाने यांनी पार पाडली आहे.

**आवाहन**

वरील प्रमाणे सोलापूर शहरातील लोकांना सोशल मिडीयाव्दारे, वॉटसअॅप कॉल, फोन कॉल करुन हिंदी / इंग्रजी भाषे मध्ये बोलून भिती व समाजात बदनामी होईल अशी भिती दाखवत आर्थिक फसवणूकीच्या घटना घडत आहेत. अशा प्रकारच्या घटने संदर्भात कोणास कॉल अथवा सोशल मिडीयावरुन व्हीडीओ कॉल आल्यास त्यांना प्रतिसाद न देता सोलापूर शहर सायबर पोलीस ठाणे, पोलीस आयुक्त कार्यालय, तिसरा मजला, सोलापूर शहर किंवा जवळच्य पोलीस ठाणे येथे तक्रार करावा असे सोलापूरातील तमाम नागरिकांना सोलापूर शहर पोलीसांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

( डॉ.दिपाली काळे )
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),
पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

सोलापूरातील सर्व प्रसिध्द दैनिक वृत्तपत्र / इलेक्ट्रीक मिडीया चे दैनिक संपादक.
२/- वरील प्रमाणे बातमीपत्र आपले लोकप्रिय दैनिकात जनहितार्थ प्रसिध्द करणेस विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner